# परिश्रमांना यशाचे मधुर फळ

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

सकाळी घरकाम, हाऊसकिपींगचे काम आणि रात्रशाळेच्या माध्यमातून अपूर्ण शिक्षण पूर्ण करण्याचा ध्यास घेतलेल्या अस्मिता आणि श्रीकांत नाकती या दाम्पत्याने दहावी परीक्षेत मधुर यश प्राप्त केले आहे. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणाची वाट खुंटलेल्या या दाम्पत्याने जनता रात्रशाळेतून शिक्षण घेताना अनुक्रमे ४९.८० टक्के व ५१.६० टक्के मिळवले आहेत.

अनेकदा वाईट परिस्थितीशी झुंज देत विद्यार्थी आपले करिअर घडवत असतात. वेळप्रसंगी रात्रशाळेतून शिक्षण घेत अनेकांना आपले शिक्षण पूर्ण करावे लागते. आर्थिक परिस्थिती वाईट असल्यामुळे ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या श्रीकांत नाकती यांना आपले शिक्षण सातवी इयत्तेनंतर अर्धवट सोडावे लागले होते. त्यानंतर मुंबई गाठून त्यांनी हाऊसकिपींगचे



काम सुरु केले. मात्र शिक्षणाअभावी प्रगती खुंटत असल्याचे लक्षात येताच त्यांनी शिक्षण पूर्ण करण्याचे ठरवले. त्यांच्या पत्नीलादेखील काही वैयक्तिक कारणांमुळे नववीच्या पुढे शिक्षण घेणे जमले नाही. त्यामुळे गोरेगावमधील संतोष नगर परिसरात भाड्याच्या घरात राहणाऱ्या या दाम्पत्याने एकत्रित जनता रात्रशाळेमध्ये प्रवेश घेण्याचे ठरवले. वर्षभर कामाचा व्याप सांभाळत रात्री रात्रशाळांमध्ये दहावीचे धडे गिरवले. आणि या मेहनतीचे फळ म्हणून त्यांनी हे कष्टपूर्वक यश प्राप्त केले आहे. भविष्यात शक्य तितके शिक्षण पूर्ण करून चांगल्या हुद्द्यावर नोकरी करण्याचे ध्येय बाळगल्याचे प्रशांत नाकती यांनी सांगितले.